रविवार दि.२८ एप्रिल २०२४

किंमत २ रुपये | महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : २४५

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    www. lokneta.com


# लोकसभा निवडणुकीत पंकजाताई यांच्या खंबीर पाठीशी मेळाव्यात सैनिकांचा निर्धार

## सैनिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर–आ.सुरेश धस

## आष्टीत आजी–माजी सैनिक वीर माता वीरच्या वीर पत्नी यांचा सैनिक मेळावा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

देशाच्या सीमेवर सैनिक असल्यानेच आम्ही घरात शांत झोपत आहोत.आपल्याला येणाऱ्या अडचणी ह्या आम्ही सोडवण्यासाठी सदैव तत्पर असून आपली कसलीही तक्रार किंवा समस्या असेल ती आपण आमच्याकडे न येता सोशल मीडियाद्वारे पाठवली तरी ती सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करू आमचे ते कर्तव्य आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी सैनिकांच्या मेळाव्यात संवाद साधताना केले.

आष्टी येथे आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील सर्व सैनिक बांधवांच्या अडीअडचणी तसेच समस्या जाणून घेण्यासाठी आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे शनिवार दि.२७ एप्रिल रोजी सकाळी ११ वा. त्रिदल आजी माजी सैनिक संघटनेचे महाराष्ट्र कोर कमिटीचे सदस्य महादेव खेडकर व तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले यांच्या अध्यक्षतेखाली सैनिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्यास बीड,लातूर,धाराशिव मतदार संघाचे आ.सुरेश आण्णा धस प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र कापरे महाराज,अहमदनगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब आंधळे,त्रिदल क्रीडा अध्यक्ष हरिभाऊ चिरके,ज्येष्ठ सल्लागार अब्बास शेख, संचालक सरपंच सतिष ढवळे,कार्याध्यक्ष मुस्तफा शेख, भाऊसाहेब बांगर,महाराष्ट्र राज्याचे कोर कमिटी महादेव खेडकर,लक्ष्मण भोरे कॅप्टन, रामदास पालवे अकबर बेग,गणेश खाडे,शहाजी ढेपे, शिवाजी पवार,आष्टी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले,कार्याध्यक्ष प्रकाश परकाळे,माजी सभापती अंकुश चव्हाण,माजी जि.प.सदस्य महेंद्र तात्या गर्जे,युवा नेते गणेश शिंदे,नगरसेवक शरीफ शेख उपस्थित होते.यावेळी पदाधिकाऱ्यांनी आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली




बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना बहुमताने निवडून आणू असा विश्वास देत सर्व संघटनेच्यावतीने जाहीर पाठिंबा देत असल्याचे यावेळी जाहीर केले.यावेळी उपस्थित आजी माजी सैनिक व नातेवाईक यांना संबोधित करताना आ.सुरेश धस पुढे म्हणाले,देशाचे कार्यक्षम पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आणि सैनिक अतिशय संरक्षणात्मक दिशा कडे जात आहे.सैनिकांना मोदी सरकार आल्यापासून अनेक सुखसुविधा देण्याचे निर्णय मोदी सरकारने घेतले आहेत.सीमेवरील हल्ल्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे.सैनिकांना येणाऱ्या अडचणी आम्ही प्राधान्याने सोडवू अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी देऊन येणाऱ्या बीड लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना आपण सर्व सैनिक वीरमाता,वीरपत्नी, आजी–माजी सैनिकांनी मतदान रुपी आशीर्वाद द्यावेत व देशाचे हात बळकट करावे असे आवाहनही शेवटी आ.सुरेश धस यांनी केले.यावेळी आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील त्रिदल आजी माजी सैनिक संघटनेचे यांच्यासह पदाधिकारी,आजी–माजी सैनिक,वीरमाता,वीर पत्नी,नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आभार महादेव खेडकर यांनी मानले.

# आधी मतदान मग लग्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

दि.२६ एप्रिल २०२४ रोजी लोणार तालुक्यातील किन्ही येथील नवरदेव वैभव प्रकाश कायंदे यांनी जिल्हा परिषद शाळा किन्ही येथे आधी मतदान करून मग लग्नाची तयारी केली.

एका –एका मतदानाचा विचार होत असताना अशावेळी नवरदेव वैभव प्रकाश कायंदे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.आपल्याला घटनेने दिलेला अधीकार बाजवायचा अशा मनोदय नवरदेव वैभव कायंदे यांनी केला.यावेळी मतदान केंद्रावर मंडळ अधीकारी लक्ष्मण सानप यांच्या सह नवरदेवाचे नातेवाईक उपस्थित होते.

## दोन–दोन खासदार निवडले, पण कामाच्या पाट्या कोऱ्या–प्रणिती शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर (वृत्तसंस्था)**

दोन–दोन खासदार निवडले. पण कामाच्या पाट्या कोऱ्या आहेत. आता उपरा आणून ठेवलाय असे म्हणत सोलापूर लोकसभेच्या मविआच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी भाजप उमेदवार राम सातपुते यांच्यावर निशाणा साधलाय. प्रणिती शिंदे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा पार पडली. यावेळी प्रणिती शिंदे बोलत होत्या. यावेळी माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील, शेकाप नेते अनिकेत देशमुख, रघुनाथराजे देशमुख, सक्षणा सलगर आदी नेते उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रणिती शिंदे म्हणाल्या, ''दोन–दोन खासदार निवडले. पण कामाच्या कोऱ्य पाट्या आहेत. त्यांच्याकडे अनुभव नाही, काम नाही. तरिही तुम्ही मोठ्या मनाने त्यांना निवडून दिले. दोघांनीही खासदारकी वाया घालवली. लोकसभेत एकदा पण बोलले नाहीत. त्यांच्याच पक्षाने त्यांना निष्क्रिय असल्याची पावती दिली. ही शोकांतिका आहे. पहिला उमेदवार आणला तो बदलला. दुसरा बदलला आता उपरा आणला'', असे म्हणत प्रणिती शिंदे यांनी राम सातपुते यांच्यावर निशाणा साधला आहे.

# सोलापूर वाडी येथील जागृत देवस्थान खंडोबा व भैरवनाथाची संयुक्त यात्रा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील सोलापूर वाडी गावांमध्ये रविवारी जागृत देवस्थान खंडोबा व भैरवनाथ यांची यात्रा सालाबाद प्रमाणे होणार आहे या यात्रेमध्ये खास करून कावडीने पैठण वरून आणलेलं पवित्र गंगाजल आणून देवांना जलाशयचा

अभिषेक करण्यात येणार आहे

त्यानंतर कावडीची मिरवणूक होणार आहे ढोल ताशांच्या गजरामध्ये देवांच्या काठ्यांची गावांमध्ये मिरवणूक होत असते या अनुषंगाने गावांमधील पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त रात्री ठीक साडेआठ वाजता देवाच्या आरतीसाठी सर्वजण एकाच वेळेला देवाच्या नावाच्या गजराने सामुदायिक आरती संपन्न होते यामध्ये भैरवनाथांचे आंबील प्रसाद म्हणून वाटप करण्यात येते.

त्याचबरोबर गुळ आणि शेरणीचा नैवेद्य सुद्धा बरेच भाविक मंडळी देवाला वाहतात या यात्रेसाठी ग्रामस्थांमधून मोठा उत्साह असतो मंदिराला आकर्षक रोषणाई चे लाईटचा डेकोरेशन केले जातो एकूणच येणार वर्ष गावासाठी सुखासमृद्धी जाणे भरभराटीचे जावो यासाठी देवाला सामुदायिक प्रार्थना केली जाते

## नकली शिवसेना एजंटसोबत मिळून काम करतेय:मोदी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**

काँग्रेसने नेहमीच राम मंदिराला विरोध केला आहे. आज शिवसेना त्यांच्यासोबतच जाऊन स्वतःचे हिंदुत्व गमावून बसली आहे. आज जर बाळासाहेब असते तर त्यांना खूप वाईट वाटले असते. तसेच उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा नकली शिवसेना असा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. तसेच, काँग्रेस ३७० हटवणार असल्याचे सांगत आहे. हे जनतेला मान्य आहे का? तुम्ही जनता हा निर्णय मागे घेऊ देणार आहात का?, मोदींच्या निर्णयाला विरोध करण्याची कुणाची हिंमत आहे का?, असे मोदी कोल्हापुरातील सभेत बोलतांना म्हणालेत.

या सभेला संबोधित करतांना नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सर्वांनी काँग्रेसवर हल्ला चढवला. परंतु कुणीही शाहू महाराज यांच्यावर वक्तव्य केले नाही. शाहू महाराजांचा उल्लेख या सर्व नेत्यांनी टाळला.

# खालापूरी येथील पाण्याचा प्रश्न एकच दणक्यात सोडवला–डॉ.जितीन वंजारे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्ह्यातील खालापूरी या ग्रामीण भागात पाण्याची तीव्र टंचाई होती,येथील जनतेला शंभर दोनशे रुपये खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत असे,पुरता गाव या दुष्काळाला कंटाळला होता पण राजकीय गुलामीतून लोक सगळं निमूटपणे सहन करताना दिसले काही युवक भडकले काहींनी तीव्र भूमिका घेतली यातच सामाजिक कार्यकर्ते डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी हंडा मोर्चा ग्रामपंचायत आणि मा.तहसील कार्यालयावर काढू अशी तिखट भूमिका घेताच दिलेल्या पाच दिवसाच्या आत गावात टँकर चालू झाले.ग्रामिन पेयजल योजना ,जलस्वराज्य योजना,पाणीपुरवठा योजना अश्या अनेक योजना राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या चालू असून येथील पुढाऱ्यांना त्याची अंमलबजावणी पण होय नसेल तर आपापल्या संविधानिक पद सोडा असाही इशारा यावेळी डॉ जितीन वंजारे यांनी दिला होता याची गंभीर दखल घेत गावाला ग्रामपंचायत ने पाणी पुरवठा चालू केल्या याबद्दल गावकऱ्यांनी आणि डॉ जितीन वंजारे यांनी आभार मानले.माझ्या मागणीला यश मिळाले पाण्याचे टँकर सुरू झाले त्याबद्दल धन्यवाद खालापूरी ग्रामपंचायत आणि सर्वच कर्मचारी

खालापूरी गावात पाण्याचा मोठा प्रश्न होता सप्ताह निमीत्त गावाकडे जाणार असल्यामुळे गावातील परिस्थितीचा आढावा घेतला असता गावात पाण्याचा प्रश्न गंभीर असलेला दिसला त्यावर आवाज उठवला हंडा मोर्चा काढनार असल्याचे सांगताच गावात टँकर चालू झाले.धिम्म शासन–प्रशासन आणि




ग्रामपंचायत वर कानात आवाज काढला की यंत्रणा जागी झाली काल गावात टँकर आले.मनोमन आनंद झाला छोट्या छोट्या गोष्टीची परिपूर्तता केली जात नाही त्यामुळे शासनाच्या योजना प्रभावीपणे गोर गरीबांपर्यंत पोहचत नाहीत हे आपलं दुर्भाग्य गावात सरपंच उपसरपंच सदस्य होन सोप्प आहे पण सामाजिक कार्य करण्याची उमेद पोटातूनच असावी लागते.गावात पाण्याचा भयंकर प्रश्न आजपर्यंत लांबवत ठेवला ही धीरगंभीर गोष्ट आहे पाण्याचं महापाप कोणीही करू नये.गावातील युवा,कार्यकर्ते आणि गावकऱ्यांनी आपल्या हक्क आणि अधिकार याकडे दुर्लक्ष करता कामा नये ......!पाणी च नाही तर आपल्याला सगळा गाव सुजलाम सुफलाम करायचा आहे.शासनाची प्रत्येक योजना प्रभावीपणे राबवणार आहोत.माझी सत्ता असेल नसेल पण सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहू.कामाचा दर्जा पूर्णत्वाने १००% गुणवत्ता दर्शक करून घेऊ.बाकी सत्ता कोणाच्याही हातात असो लोकांच्या समस्स्यांचे निराकरण करण्यासाठी अर्ध्या रात्री मी मा.सम्राट डॉ जितीन दादा वंजारे खालापूरीकर तत्पर असतो,आहे आणि भविष्यातही राहील.

# नांदा गावचे भूमीपुत्र शहीद विष्णु रघुनाथ औटे यांना वीरमरण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यांतील नांदा गावचे भुमीपुत्र शहीद विष्णु रघुनाथ औटे मेजर वय ४४ हे दि.२६/०४/२०२४ रोजी जम्मु काश्मिर येथे देशसेवेत कार्यरत असताना वीरगतीस प्राप्त झाले भारत मातेच्या वीर सुपुत्रास भावपुर्ण श्रद्धांजली देण्यात आली.शुक्रवारी संध्याकाळी माहिती धडकताच नांदा गांवासह संपूर्ण पंचक्रोशी शोक सागरात बुडाली,आष्टी तालुक्यांत नांदा गावातील भुमीपुत्र विष्णु रघुनाथ औटे हे सन २००१ मध्ये आर्मी भरती झाले होते.नांदा गावचा सुपुत्र शहीद झाल्याचे समजताच औटे परिवारांसह पंचक्रोंशीवर शोककळा पसरली होती.यांच्या घरी पोहोचले,त्यांनी शहीद कुटुंबियांचे सांत्वन केले,या जवानाचे पार्थिव शनिवारी संध्याकाळी नांदा गावांत पोहोचल्यानंतर आष्टी तालुक्यातील व नांदा गावांतील आजी–माजी सैनिक तसेच सर्व नांदा आ.जिप.सदस्य, पं,स, सदस्य, ग्रामस्थ, पोलीस पाटील, सरपंच उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य, सर्वच माता बहिणींनी भारत माता की जय,अमर रहे अमर रहे विष्णु औटे अमर रहे! जड अंतकरणाने घोषणा दिल्या.त्यानंतर सजवलेल्या लष्करी वाहनांतून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली त्यानंतर शहीद जवान विष्णु औटे यांना बीड जिल्हा पोलीस प्रशासनाकडून तसेच लष्करी विभागाकडून अखेरची मानवंदना देत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुली,मुलगा,भाऊ,आई असा परिवार आहे.



## चारोळी

**वाऱ्याची झुळूक येता**
**पानंही ताल धरुनी नाचू लागतात**
**फार काही नको असतं त्यांना**
**फक्त काही क्षणाची सोबत मागतात.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

संपादकीय

# बेशिस्तीला बडगा

रिझर्व्ह बँकेने कारवाईचा बडगा उगारल्यावर कोटक महिंद्र बँकेने सुधारणात्मक उपाययोजना करणार असल्याचे सांगितले आहे. हेच आधी का केले नाही?

काही सरकारी बँकांना गंडा घालून परदेशात पळून गेलेल्या विजय मल्ल्या, नीरव मोदी अशा 'थोर' व्यक्तींचा ठावठिकाणा काय आणि त्यांनी लुटलेल्या पैशाचा हिशेब याची चर्चा अधूनमधून होत असते आणि त्यांना मुसक्या बांधून परत आणण्याच्या गर्जनाही सत्ताधारी मोठ्या आवेशाने करतात आणि नंतर त्या विरूनही जातात.

थकीत, बुडीत कर्जांचे हजारो कोटींचे आकडे बाहेर आले की, आपल्याकडच्या बँकिंगविषयी चिंतायुक्त चर्चा होत असते. अशा चर्चेत उपस्थित केला जाणारा एक मुद्दा बँकांच्या खासगीकरणाचा असतो. अकार्यक्षमता, भ्रष्टाचार यासारख्या समस्यांपासून वाचण्यासाठी खासगीकरण हा रामबाण उपाय आहे, अशीही काहींची धारणा असते.

खासगी क्षेत्रात बँकांना परवानगी दिल्यास त्यांच्यातील स्पर्धेमुळे ग्राहकांना पर्याय उपलब्ध होतील आणि त्यायोगे सेवाही उत्तम मिळेल, हा त्यामागील मुख्य युक्तिवाद असे. परंतु २००३ मध्ये खासगी बँकांना प्रवेश दिल्यानंतरचा अनुभव पाहिला तर काय दिसते? नव्या डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करीत अनेक प्रकारची नवी बँकिंग उत्पादने या खासगी बँकांनी आणली. आर्थिक व्यवहार गतिमान झाले.

या खासगी बँकांमध्ये स्पर्धाही निर्माण झाली. बऱ्याच अंशी राष्ट्रीयीकृत बँकाही नव्या प्रवाहात सहभागी झाल्या. परंतु या सगळ्या स्थित्यंतरात ज्या नव्या समस्या निर्माण झाल्या,प्रशासनाबाबतचे जे प्रश्न समोर आले त्यांची झलक रिझर्व्ह बँकेने अशा बँकांवर अलीकडच्या काळात जे व्यावसायिक निर्बंध लागू केले, त्यावरून दिसते.

यातील ताजी कारवाई म्हणजे कोटक महिंद्र बँकेवर रिझर्व्ह बँकेने उगारलेला निर्बंधात्मक कारवाईचा बडगा. कोणत्याही नव्या ग्राहकाला 'क्रेडिट कार्ड' देण्यास मनाई करण्यात आली आहे; तसेच ऑनलाइन आणि मोबाईल बँकिंगचे नवे ग्राहक मिळविण्यालाही प्रतिबंध करण्यात आला आहे.

रिझर्व्ह बँकेने यासंदर्भात बँकेला जी नोटिस पाठवली आहे, त्याच्या तपशीलावर नजर टाकली तर हा प्रामुख्याने प्रणालीतील मूलभूत दोषांचाच मुद्दा आहे, असे दिसते. कोणत्या एखाद्या गैरव्यवहाराचा उल्लेख त्यात नाही. परंतु वित्त जोखीम व्यवस्थापन, माहितीची सुरक्षितता, आवश्यक त्या बदलांचे व्यवस्थापन अशा अनेक बाबींमध्ये कोटक महिंद्र बँकेची माहिती–तंत्रज्ञानप्रणाली 'फूलप्रुफ' नाही, असे रिझर्व्ह बँकेला आढळून आले.

यापूर्वी असे काही घडले की दंडावर भागले जायचे. आता मात्र संबंधित सेवा स्थगित करण्याची कठोर उपाययोजना केली जात आहे. गेल्या काही दिवसांत एचडीएफसी बँक, पेटीएम पेमेंट बँक, आयआयएफएल आदींनाही व्यवस्थात्मक प्रणाली सुधारण्याबाबतच्या सूचनांचे अनुपालन न झाल्याबद्दल रिझर्व्ह बँकेने इशारा दिला होता.

कोटक महिंद्र बँकेला खरे तर दोन वर्षांची मुदत देऊन सुधारणात्मक उपाय करण्यास सांगितले होते. तरीही बँक व्यवस्थापनाकडून त्याकडे दुर्लक्ष केले गेले असेल, तर याला अगदी सौम्य शब्द वापरायचे झाले तर बेफिकिरीचेच उदाहरण म्हणावे लागेल. ग्राहकांच्या हिताचे सर्वार्थाने संरक्षण होणे हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्याचा एक भाग अर्थातच आर्थिक आहे.

परंतु त्याने सादर केलेल्या माहितीची–'डेटा'ची सुरक्षा हाही सध्याच्या काळातील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. 'डेटा' हीच संपत्ती हा नव्या काळाचा मूलमंत्र झाला आहे. या वैयक्तिक माहितीला पाय फुटण्याची शक्यता असते. तिचा वेगवेगळ्या प्रकारे वापर केला जातो. त्यामुळे या सर्वच बाबतीत माहिती–तंत्रज्ञानप्रणाली अद्ययावत नसेल तर तो धोका संभवतो.

रिझर्व्ह बँकेने तो वारंवार लक्षात आणून दिल्यानंतरही कार्यवाही केली जाऊ नये, ही बाब गंभीर आहे. गेल्या दोन दशकांचा विचार केला तर आपल्याकडच्या बँकिंग व्यवस्थेत मोठे बदल झाले. त्यातील तंत्रज्ञानाचा अवलंब प्रचंड प्रमाणात वाढला. हे स्थित्यंतर सुरळित झाले असे नाही. आजही त्या बदलाच्या प्रक्रियेतील अवघडलेपणाचा अनुभव अनेक ठेवीदारांना येत असतोच.

या बदलाचा एक ठळक भाग असा की, बँकिंग व्यवहारातील मानवी चेहरा लुप्त होत चालला आहे. ऑनलाईन व्यवहारच होऊ लागल्याने बँकर आणि कर्जदार यांचा थेट संवाद सर्वच पातळ्यांवर कमी झाला. जर असे असेल तर निदान ज्या माहिती–तंत्रज्ञान प्रणालीद्वारे सगळे व्यवहार होतात, ती अद्ययावत आणि नव्या गरजांना सामावून घेणारी असली पाहिजे.

खासगी बँकांची मुख्य प्रेरणा नफा ही आहे, हे उघड आहे. परंतु तो कमावताना खर्च वाचवण्यासाठी माहिती–तंत्रज्ञानाची संरचनात्मक यंत्रणा मजबूत करण्यास बँकांचे चालक प्राधान्य देत नसतील, तर ती बाब गंभीरच आहे. 'आता सर्व सुधारणात्मक उपाय आम्ही योजत असून लवकरच सर्व सेवा पूर्ववत सुरू होतील,' असे निवेदन कोटक महिंद्र बँकेच्या वतीने प्रसृत करण्यात आले आहे. पण हे वेळीच का होऊ शकले नाही, हा प्रश्न उरतोच.

या निमित्ताने आपल्याकडील नियामक यंत्रणांचे महत्त्व अधोरेखित होते. वित्तीय व्यवहारांची स्थिरता ही विकासाची पूर्वअट असते. बँकिंग हा अर्थव्यवहाराचा कणा असल्याने त्या क्षेत्राचे स्वास्थ्य चांगले असणे अत्यंत महत्त्वाचे. तेच जर बिघडले तर होणारा अनर्थ एखाद्या बँकेपुरता सीमित राहात नाही. म्हणूनच अशा घटनांची दखल गांभीर्याने घ्यावी लागते.

# बौद्धिक संपदेची क्षितिजे

जगात अमेरिका तसेच युरोपीय देशांनी बौद्धिक संपदेबाबत मोठी झेप घेतली आहे. चीनही त्याच वाटेने जात आहे. या क्षेत्रात भारतालाही मोठा वाव आहे. आजच्या (ता.२६) जागतिक बौद्धिक संपदा दिनानिमित्ताने या क्षेत्रातील वास्तवाविषयी.




संयुक्त राष्ट्रांच्या अनेक शाखा–उपशाखा आणि त्याला अनुसरून आंतरराष्ट्रीय संस्था कार्यरत असतात. त्यापैकीच बौद्धिक संपदा या विषयाला अनुसरून जागतिक बौद्धिक संपदा संस्था ही जीनिव्हा येथे कार्यरत आहे. पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क, भौगोलिक चिन्हांकन (जीआय) या विषयांना एकत्रितरित्या 'बौद्धिक संपदा' असे म्हणतात.

मानवाच्या बुद्धीतून निर्माण झालेल्या या संपदा असल्याकारणाने त्यांना 'बौद्धिक संपदा' असे संबोधण्यात येते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'जागतिक बौद्धिक संपदा संस्था' अस्तित्वात आहे.संयुक्त राष्ट्रांच्या अखत्यारीत या संस्थेची निर्मिती करण्यात आली आणि ज्या दिवशी या संस्थेची स्वीकृती करण्यात आली तो २६ एप्रिल हा दिवस 'जागतिक बौद्धिक संपदा दिवस' म्हणून जगात साजरा करण्यात येतो.

बौद्धिक संपदेचे जागतिक स्तरावरील सामाजिक आणि आर्थिक योगदान महत्त्वाचे आहे. बौद्धिक संपत्तीविषयी जगभरात जागरुकता व्हावी, नागरिकांमध्ये सजगता येऊन त्यांचे त्यासाठी प्रयत्न वाढावेत, या उद्देशाने जागतिक बौद्धिक संपदा दिवसाचे नियोजन केले जाते.

दरवर्षी जगासमोरील एखादा महत्त्वाचा विषय घेऊन त्या विषयाला अनुसरून बौद्धिक संपदा दिवसाची संकल्पना (थीम) तयार केली जात असते. ही संकल्पना जगभरात सर्वदूर पोहोचवण्यासाठी विविध कार्यक्रम, उपक्रम आखले जातात. यंदाच्या जागतिक बौद्धिक संपदा दिवसाची मुख्य संकल्पना आहे 'बौद्धिक संपदा, संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकासाचे उद्दिष्ट आणि भविष्यातील वाटचाल'.

संयुक्त राष्ट्राचे १९४ सदस्यदेश आहेत. या सभासद देशांच्या अनेक प्रश्नांवर संयुक्त राष्ट्रे काम करतात. जगात शांतता कशी नांदेल, जगातील सर्व देशांची आणि घटकांची प्रगती कशी साधता येईल, यावर सतत विचारमंथन होत असते. अशा विचारमंथनातून विविध उद्दिष्टे समोर आली. संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये अशी सतरा उद्दिष्टे किंवा गोल निश्चित केले आहेत.

त्याला 'शाश्वत विकासाची उद्दिष्टे' (सस्टेनबल डेव्हलपमेंट गोल) असे नावही देण्यात आले आहे. ही उद्दिष्टे २०३० पर्यंत साध्य करायची, असे निश्चित करण्यात आले आहे. या उद्दिष्टांमध्ये गरिबी नष्ट करणे, भूकबळी दूर करणे, उत्तम आरोग्य, उत्कृष्ट शिक्षण यांच्यापासून ते शांतता, न्याय आणि पर्यावरणसंरक्षण तसेच पाण्याचे संवर्धन व उत्तम आंतरराष्ट्रीय सलोखा जगभरात निर्माण होणे इत्यादी घटकांचा समावेश आहे.

या उद्दिष्टांमध्ये विशेष करून संशोधनातून उद्योग व्यवसायाची प्रगती साधत हरित ऊर्जा निर्माण करणे आणि त्या अनुषंगाने उत्तम व पर्यावरणपूरक शहरीकरण करण्यावर भर देणे यांचा समावेश आहे. या उद्दिष्टांना धरून जगभरात वेगवेगळ्या स्तरावर कार्य सुरू आहे. या उद्दिष्टांना महत्त्वाची साथ बौद्धिक संपदेतून मिळत आहे, असे निदर्शनास आले.

शाश्वत विकास

वेगवेगळ्या देशांमध्ये आणि विशेष करून प्रगत देशांमध्ये हरित ऊर्जेवर जे संशोधन झाले त्यामध्ये अनेक पेटंट्स घेतले गेले, ते पेटंट इतर सभासद देशांमध्ये पोहोचवण्यासाठी जागतिक बौद्धिक संपदा संस्थेने एक डाटाबेस तयार केला आहे. यंदाच्या बौद्धिक संपदा दिवसाच्या माध्यमातून तो डाटा सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी एक अहवाल सुद्धा तयार करण्यात आला आहे. त्याला 'पेटंट आणि शाश्वत विकास उद्दिष्ट अहवाल' असे संबोधण्यात आले आहे.

भारतातही अशी अनेक पेटंट जी हरित पर्यावरणाला पूरक आहेत, ती ग्राह्य धरलेली आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास ऊर्जानिर्मिती विशेष करून दोन प्रकाराने होत असते– एक पाण्याच्या माध्यमातून जलविद्युत निर्मिती केली जाते, तर दुसऱ्या प्रकारात प्रकल्पात कोळसा किंवा तत्सम इंधनाचे ज्वलन करून औष्णिक विजेची निर्मिती केली जाते.

या प्रकल्पामध्ये ऊर्जानिर्मितीसाठी जेवढी सामग्री (इनपूट) वापरली जाते त्याच्या ४५ ते ६० टक्केच ऊर्जा (आउटपुट) निर्माण होऊ शकते. या अडचणीवर मात करीत पुण्यातील दोन अभियंत्यांनी ऊर्जानिर्मितीचे आउटपुट ऐंशी टक्क्यांपर्यंत नेले आहे, जेणेकरून कमी खर्चात अधिक प्रमाणात ऊर्जानिर्मिती होऊ शकेल. त्यांच्या या संशोधनाला भारत सरकारचे पेटंटही मिळाले आहे.

शिवाय, त्यांचे हे संशोधन जागतिक बौद्धिक संपदा संस्थेच्या डाटाबेसचादेखील एक भाग आहे. त्यामुळे त्यांचे संशोधन जगभरात पोहोचत आहे, अमेरिकेमध्ये सत्तर टक्के वीजनिर्मिती औष्णिक प्रकल्पांच्या माध्यमातून केली जाते. अशा वेळेला भारतात केले गेलेले संशोधन, म्हणजेच हे पेटंट अमेरिकेमध्ये उपयुक्त ठरू शकते.

त्यामुळे स्वस्तात वीज निर्मिती होईलच; शिवाय इंधनाचा वापर निम्मा झाल्याने पर्यावरण प्रदूषणाच्या प्रश्नावर देखील मोठ्या प्रमाणात मात होईल. थोडक्यात पेटंटसारख्या बौद्धिक संपदा या संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास अभ्यासासाठी अत्यंत पूरक आहेत आणि त्याचा फायदा जगभरातील देशांनी घ्यावा, असा महत्त्वाचा संदेश या वर्षीच्या जागतिक बौद्धिक संपदा दिवसानिमित्त निश्चित करण्यात आला आहे.

भारताला वाव

पेटंटबरोबर अजून एक महत्त्वाची बौद्धिक संपदा जिच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकास उद्दिष्ट साध्य करणे सुकर झाले आहे, ती म्हणजे भौगोलिक चिन्हांकन किंवा जिऑग्राफिकल इंडिकेशन (जीआय). या बौद्धिक संपदेमध्ये पारंपरिक पद्धतीने तयार केले जाणारे शेतीजन्य पदार्थ अथवा निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी मंडळींकडून तयार केली जाणारी वस्तू; मग ती बांबूची असो किंवा मातीची असो, त्याला 'जीआय' मानांकन मिळते.

युरोपमध्ये अशा 'जीआय' नोंदी जवळपास साठ हजार झाल्या आहेत. तसेच चीनमध्येसुद्धा जवळपास अकरा हजार 'जीआय' नोंद झाल्या आहेत. भारताची वाटचाल ही केवळ सातशे 'जीआय'पर्यंत झालेली आहे. 'जीआय' हा पूर्णपणे पर्यावरणपूरक आणि समूहाचा बौद्धिकसंपदा अधिकार असल्याने त्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसह संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकासाचे उद्दिष्ट साध्य होते.अशाप्रकारे वेगवेगळ्या बौद्धिक संपदांच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य होत आहेत आणि ठरवलेल्या २०३० या कालावधीपर्यंत ते साध्य होऊ शकेल, असा संदेश घेऊन यंदाचा बौद्धिक संपदा दिवस साजरा होतो आहे.

ज्या देशांपर्यंत बौद्धिक संपदा आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांबाबतची माहिती पोहोचली नसेल तिथे ती पोहोचविण्याचे तसेच त्याचा पुरेपूर विनियोग करण्याचे उद्दिष्टही यंदाच्या जागतिक बौद्धिकसंपदा दिवसाचे आहे. भारत सरकारही त्यादृष्टीने पावले उचलेल आणि बौद्धिक संपदेच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांचे उद्दिष्ट गाठण्यात योगदान देईल, अशी आशा करूया!

# मतदानाचा हक्क आणि विधिनिषेध

लोकशाही प्रक्रियेत मतदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. राजकीय पक्षांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन करून मतदारांनी विवेकबुद्धी वापरून आपला हक्क बजावला पाहिजे.



सन २०२४ मधल्या लोकसभा निवडणुकीला आपण सामोरे जात आहोत. भारताचे क्षेत्रफळ, लोकसंख्या आणि वैविध्य इत्यादी पैलू तर कुणालाही थक्क करणारे आहेत. पण भारताच्या घटनासभेने स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर, 'आपला देश लोकशाही मार्गानेच या पुढची वाटचाल करील', अशी घोषणा केली. एकेका प्रौढ व्यक्तीला मतदानाचा हक्क बहाल केला. १९५२ मध्ये लोकसभेची पहिली निवडणूक झाली, त्याला पंच्च्याहत्तर वर्षे झाली असताना आपण अठराव्या लोकसभेसाठी मतदान करत आहोत. या निवडणुकांचा धावता आढावा घेतला तरी भारतीय मतदारांविषयी अभिमान वाटेल, असा लोकशाहीचा प्रवास झाला, असा निष्कर्ष काढता येईल.

आपले पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद संविधान सभेतल्या एका भाषणात म्हणाले होते, 'मी खेड्यापाड्यात राहिलो आहे. माझ्या अनुभवाच्या आधारावर सर्वांना सांगतो की, या खेड्यापाड्यातला सर्वसामान्य माणूसही विवेकी वर्तन करतो. तेव्हा हा सर्वसामान्य भारतीय डोळे उघडे ठेवून मतदान करील आणि भारताचे भवितव्य घडवेल.'' बाबू राजेंद्र प्रसादांचे द्रष्टेपणच गेल्या साडेसात दशकातून सिद्ध झाले आहे.

आज एकशे चाळीस कोटींपेक्षा अधिक लोकसंख्येचा आपला देश जगाला सांगू शकतो की, आणीबाणीसारखी लोकशाहीवर आपत्ती ओढवली तेव्हा इथल्या जनसामान्यानेच तत्कालीन काँग्रेस सरकारला पराभवाची धूळ चारली. आश्चर्य म्हणजे, त्यानंतर अल्पावधीतच जनता पक्षाला पराभूत करून काँग्रेसच्याच इंदिरा गांधींना पुनश्च सत्ताधीश बनविण्यातही या मतदारानेच पुढाकार घेतला.

देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी आलेल्या टी. एन. शेषन यांनी आदर्श आचारसंहिता काय असते आणि तिची कठोर अंमलबजावणी करता येते; त्याच्या चौकटीतच राजकीय पक्षांना प्रचार करावा लागतो, भले ते कोणही असो, याची जाणीव करून दिली.

२०१४ पासून उलटलेल्या दहा वर्षांत लोकशाही मार्गानेच आपण मूलगामी परिवर्तन राजकारणात घडवून आणले. खरे म्हणजे भारतात लोकशाही कशी रूजेल? इथे तर अराजकच माजेल, असा दावा करणारे पश्चिमी विचारवंत अशुभाचे प्रेषित व म्हणून मतदारांकडून बहिष्कृत ठरले. अर्थात आपल्या लोकशाहीमध्ये काही त्रुटी वा उणिवा जाणवत आहेत, त्यांचीही चर्चा केली पाहिजे.

सुजाण मतदारांचा धाक

अर्थात एका उल्लेखनीय कामगिरीची प्रारंभी दखल घेतली पाहिजे. सर्वच राजकीय पक्षांना आपल्या सुजाण मतदारांचा जणू धाक वाटत आहे. म्हणूनच भारतातून फुटून निघण्याची उक्ती वा कृती कोणीही करू शकत नाही. ज्या कम्युनिस्ट मंडळींना त्यावेळच्या सोव्हिएत युनियनचे कौतुक करण्याचा मोह होत असे वा वर्तमानात चीन हा मॉडेल देश वाटतो, त्यापैकी कुणीही तिथल्या एकपक्षीय झोटिंगशाहीचे आपण अनुकरण करावे, अशी शिफारस करण्यास धजत नाही.

अशा देशातून एकच उमेदवार रिंगणात असतो, पण समजा कुणा मतदाराला या उमेदवाराला नापसंत करायचे असेल तर त्याने मतदान केंद्रात वेगळ्या खोलीत जाऊन या उमेदवाराच्या मतपत्रिकेतल्या नावावर म्हणे फुली मारावी, अशी तरतूद तिथे अवश्य आहे. पण जो माणूस या खोलीत जाईल, त्याच्यावर पाळत ठेवण्याचीही व्यवस्था आहे. या परिस्थितीत कुणाची हे साहस खरीदण्याची हिंमत होईल?

आपल्याकडे न्यायसंस्था स्वतंत्र आहे, प्रसारमाध्यमे मुक्त आहेत. सत्तारूढ पक्षाला विरोधकांच्या आक्षेपांना सामोरे जावे लागते. निवडणूक आयोग सत्तारूढ पक्षाला ताळ्यावर आणू शकतो. या वातावरणाचा योग्य लाभ उठविण्यासाठीच एकेका मतदाराने उमेदवाराच्या कर्तृत्वाचा विचार करावा. हा उमेदवार कोणत्या पक्षाच्या वतीने रिंगणात उतरला आहे, त्या पक्षाचे योगदान आणि त्रुटी विचारात घ्याव्यात.

हा विशिष्ट पक्ष त्याच्या मूळच्या उद्दिष्टांशी इमान राखतो की नाही, यावर सुद्धा विचार करावा! अर्थात केवळ भावना, केवळ आवेश अन् अभिनिवेश यावर न विसंबता शांतपणे विचार करावा. डॉ. आंबेडकर सांगून गेले आहेत की, मतदानाचा अधिकार तर प्रत्येकाला मिळाला आहे, पण त्याच मतदाराला सामाजिक व आर्थिक विषमतेला तोंड द्यावे लागते.

तेव्हा जो राजकीय नेता आणि पक्ष अशा विषमता निर्मूलनाबाबत निष्क्रिय असेल त्याला निवडून का द्यायचे? ज्या पक्षाच्या अंतर्गत कारभारात लोकशाही शून्यवत आहे, जिथे कार्यकर्त्यांची साखळीच नाही, जिथे केवळ लंबी चवडी भाषणबाजी आहे, तो पक्ष आपल्या देशाचे भविष्य कसे घडविणार? जो पक्ष केवळ निवडणूक जाहीर झाल्यावरच अस्तित्व दाखवतो आणि नंतर पाच वर्षांत कुठलेच काम करीत नाही, त्याला मत देण्यात काय लाभ आहे?

गेल्या साडेसात दशकात धनशक्ती आणि मनगटाची शक्ती यांच्या बळावरच कुणी एखादा निवडणुकीत निवडून येतो आणि राजकीय पक्ष अशा मुजोरीसमोर शरण जातात, असे दिसून आले आहे. तेव्हा मतदारांनीच संघटित होऊन या धटिंगणाला पराभूत केले पाहिजे. जर एखादा राजकीय पक्ष या व्यक्तीला प्रसंगी साम, दाम, भेद वा दंड वापरून ताळ्यावर आणण्याची क्षमता बाळगत असेल तर त्या राजकीय पक्षाला मात्र मतदारांनी भरघोस मतांनी निवडून देण्याची आवश्यकता आहे.

विद्यार्थी केवळ परीक्षार्थी होऊ नयेत, त्यांनी खऱ्या ज्ञानाची उपासना करावी! तसेच राजकीय पक्ष केवळ निवडणूक आल्यानंतरच जागे होऊन वृत्तपत्रांमधून वाजतगाजत असतील तर त्यांनाही मतदारांनीच ठिकाणावर आणावे. महत्त्व सत्तेला नाही, निरंतर जनसेवेला आहे! मतदार असाच सांगोपांग विचार करून आपला मतदानाचा हक्क बजावतील, अशी आशा करूया!

# आनंदाने जगण्याची कला

आनंद हा आपल्या मनावर अवलंबून असतो, कोणी कुंडीतलं एक फूल पाहूनही आनंदी होतो तर कोणी फुलांची बाग असली तरी आनंदी नसतो. आनंद ही अनुभूती आहे, जी प्रत्यक्ष जगण्यामध्ये अनुभवता येऊ शकते, काही लोक कायम आनंदी असतात. कितीही अडचणी आल्या तरीसुद्धा त्या अडचणींना आनंदाने सामोरे जाण्यासाठी त्यांचं अंतर्मन हे आनंदाने भरलेलं असतं. एकदा का आपल्या मनाला खळखळता आनंदी झरा बनवलं की त्या झऱ्याचं पाणी पिण्यासाठी अनेक वाटसरू येतात आणि तेही आनंदी होऊन जातात.मला छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद घ्यायला खूप आवडतो आणि तू दुसऱ्याला वाटायलाही. अगदी एखाद्या अनोळखी छोट्या बाळासोबत गप्पा मारायला वेगळाच आनंद येतो, रोपट्यावर आलेलं एखादं फूलसुद्धा मनाला खूप आनंद देऊन जातं, पहाटेच्या निवांत वेळी उगवणाऱ्या सूर्याकडे आणि पूर्व दिशेला बदलणाऱ्या आकाशाकडे पाहत राहणं, पहिल्या पावसात चिंब होऊन भिजणं, त्या पावसाचा शिडकावा पडताच मातीचा स्वर्गीय सुगंध शरीरभर भरून घेणं, कुडकुडत्या थंडीच्या दिवसांत तोंडातून वाफ बाहेर पडत असताना दूरवर हिंडायला जाणं यात एक वेगळीच गंमत आहे. दिवाळीचा किल्ला करताना मुलांसोबत पुन्हा लहान व्हावं, दारात सुंदर रांगोळीमध्ये निगुतीने रंग भरावेत. यात सणाचा आनंद तर वाढतोच, पण घरात येणाऱ्याचं मनही आनंदी होऊन जातं. फिश टँकमधल्या माशांची हालचाल निरखण्यासारखं डोळ्यांना मिळणारं सुख नाही. घरात पाळलेल्या प्राणीमित्रांसोबत लहान होऊन संवाद साधून बघा, मनावरचा ताण कुठल्या कुठे निघून जाईल. कधी ज्येष्ठांजवळ वेळ काढून जा, त्यांची ख्यालीखुशाली विचारा. हात हातात घ्या. त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यांमधून जी मायेची साय पाझरेल, त्याची सर कशालाच नाही.

आनंद कुठे नाही? चराचरात आनंद सामावलेला आहे. अगदी पहाटे गवतावर पडलेल्या दवबिंदूंचा पायाला झालेला स्पर्श, निसर्गाच्या सानिध्यात बसल्यावर झाडांची सळसळ, पक्ष्यांचा चिवचिवाट, आकाशातील ढगांची धावपळ, इंद्रधनुष्य हा सगळा आनंदाचा सोहळाच आहे, असं वाटतं. हा आनंद आपल्याला ईश्वराने भरभरून बहाल केला आहे, फक्त आपल्या हाताची ओंजळ आपण त्याच्याकडून भरून घ्यायची आणि ती सांडण्याअगोदर इतरांमध्ये वाटायची.

जीवनातील प्रत्येक क्षण आनंदाने घालवायचा हे महत्त्वाचं. समोरच्याच भरभरून कौतुक केलं तर त्यालाही वेगळा आनंद मिळतो. म्हणतात ना, दुसऱ्याच्या कपाळाला चंदनाचा टिळा लावताना स्वतःच्या बोटाला सुगंध येतो. त्याचप्रमाणे, 'बस अपने पास की अच्छाईयां बांटते चलों, फिर खुशियोंकी कोई कमी नहीं रहेगी,' हे ध्यानात ठेवायचं. मनाच्या गाभाऱ्यात चैतन्य, हास्य, सकारात्मकतेचा झरा वाहत ठेवला की आनंदाच्या समुद्राची नक्की भेट होते. कोणत्याही परिस्थितीत आनंदी राहायची सवय लावून घ्या स्वतःला, मग दुःखाला दहावेळा विचार करावा लागेल जवळ येताना.आनंदाचे झाड मी माझ्या मनात लावलं तर त्याला आनंदाचीच फुले येतील अन् त्याचा वासही आनंदी असेल. ते फूल कोणी सुगंध घेण्यासाठी घेईल, कोणी डोक्यात माळेल, कोणी इतरांना भेट म्हणून देईल, कोणी त्याचा वास मनाच्या गाभाऱ्यात जपून ठेवेल, तर कोणी ते आनंदाचे फूल आजारी माणसाला देऊन त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद वाढवेल. कोणी ते देवाच्या चरणावर ठेवून परमानंद घेईल. आता तुम्ही ठरवायचं की ते कुणाला आणि कसं वाटायचं.

दैनिक लोकनेता



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मताचा अधिकार ही नागरिकांची मोठी ताकद - रानबा गायकवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

महामानव ,विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून दिलेला मताचा अधिकार या देशातील नागरिकांची मोठी ताकद असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले.ते कौडगाव साबळा येथे आयोजित करण्यात आलेल्या विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



कौडगाव साबळा येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध साहित्यिक ए .तु.कराड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष रामदादा किरवले, सरपंच साबळे पाटील ,एकतावादी रिपाईचे बीड जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे, धनंजय व्हावळे सर,डॉ. विनय कराड, आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रानबा गायकवाड म्हणाले की , देशातील टाटा ,बिर्ला ,अंबानी अथवा आदानी असो आणि सामान्य नागरिक असो सर्वांना समान एक मताचा अधिकार दिलेला आहे .या एका मताच्या अधिकारावर सत्ता परिवर्तन करण्याची ताकद घटनेच्या माध्यमातून बाबासाहेबांनी दिलेली आहे .यावेळी राम दादा किरवले यांनी बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून निर्माण केलेली व्यवस्था उध्वस्त करण्याचे काम मनुवादी करत असल्याने आंबेडकरी अनुयायांनी सावध राहिले पाहिजे असे आवाहन केले.

अध्यक्ष समारोप करताना ए .तु.कराड यांनी डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांना विकासासाठी शिक्षणाचा महामंत्र दिलेला आहे .आणि शिक्षणामुळेच बहुजनांची प्रगती झाल्याचे सांगितले. तसेच तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरपंच साबळे पाटील यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले .कार्यक्रमास कौडगाव साबळा येथील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश किरवले यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार भालेराव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# देशात महिला मुली असुरक्षित निषेधार्थ परळीत उपविभागीय अधिकारी यांना निवेदन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी येथे कर्नाटकातील हुबळी तालुक्यातील सौंदती येथील नेहा निरंजन हिरेमठ या महाविद्यालयीन विद्यार्थिनीच्या हत्या प्रकरणातील आरोपींस कठोर शासन करावे व हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालउन आरोपीस मरेपर्यंतची फाशी शिक्षा देण्यात यावी अशी मागणी वीरशैव समाज परळीच्या वतीने तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांची बुधवारी भेट घेऊन निवेदनाद्वारे करण्यात आली आहे यावेळी भेटलेल्या शिष्टमंडळात महाराष्ट्र वीरशैव सभेचे तालुकाध्यक्ष महादेव ईटके ,शिवा संघटनेचे तालुका अध्यक्ष अनिल अष्टेकर महाराष्ट्र विरशैव सभेचे शहराध्यक्ष नितीन समशेट्टे, शिवलिंग स्वामी ,अश्विन मोगरकर, बंडू चौंडे ,वैजनाथ पुसकर, गणेश वारके ,अरविंद बेलाळे, राजकुमार भाग्यवंत, सचिन काटकर, रविशंकर स्वामी ,राज बरदाळे, सूर्यकांत कोरे, राजेश साखरे, रमाकांत हरंगुळे, श्रीमंत तोडकरी उमाकांत तोडकरी यांच्यासह इतर कार्यकर्त्यांचा समावेश होता. एकतर्फी प्रेमातून नेहा हिरेमठ हीची हत्या झाली असून या घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदविण्यात आला आहे

# ३८-शिर्डी लोकसभा मतदारसंघात शुक्रवारी, २६ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिर्डी । प्रतिनिधी**

३८ शिर्डी लोकसभा निवडणुकीत नामनिर्देशन अर्ज वैध ठरलेल्या उमेदवारांपैकी - भाऊसाहेब राजाराम वाकचौरे (शिवसेना - उध्दव बाळासाहेब ठाकरे), लोखंडे सदाशिव किसन (शिवसेना), चंद्रकांत संभाजी दोंदे (अपक्ष), अभिजीत अशोकराव पोटे (अपक्ष), भारत संभाजी भोसले (समता पार्टी), नितीन दादाहरी पोळ (बहुजन भारत पार्टी), बागुल गोरक्ष तान्हाजी (अपक्ष), ड. सिध्दार्थ दिपक बोधक (अपक्ष) , अशोक रामचंद्र आल्हाट (जनहित लोकशाही पार्टी), सतिष भिवा पवार (अपक्ष), संजय पोपट भालेराव (अपक्ष), रामचंद्र नामदेव जाधव (बहुजन समाज पार्टी), उत्कर्षा प्रेमानंद रूपवते (वंचित बहुजन आघाडी), गंगाधर राजाराम कदम (अपक्ष), भाऊसाहेब रामनाथ वाकचौरे (अपक्ष) , प्रशांत वसंत निकम (अपक्ष), खरात नचिकेत रघुनाथ (अपक्ष), संजय हरिश्चंद्र खामकर (बळीराजा पार्टी), राजेंद्र रत्नाकर वाघमारे (राष्ट्रीय जनक्रांती पार्टी), रविंद्र कलय्या स्वामी (अपक्ष), खाजेकर विजयकुमार गोविंदराव (अपक्ष) व सना मोहंमद अली सय्यद (अपक्ष) असे आहेत.नामनिर्देशन पत्र अर्ज अवैध/नाकारण्यात आलेले अर्जदार - राजू शिवराम खरात (बहुजन समाज पार्टी), डोळस जयाबाई



राहूल (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-), अशोक अनाजी वाकचौरे (अपक्ष), चंद्रहार त्र्यंबक जगताप (अपक्ष), शंकर संभाजी भारस्कर (अपक्ष), दिलीप भाऊसाहेब गायकवाड (अपक्ष), डॉ.अशोक बाजीराव म्हंकाळे (अपक्ष), संतोष तुळशीराम वैराळ (अपक्ष) व सतिष भुपाल सनदी (अपक्ष) असे आहेत.नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख २९ एप्रिल सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत आहे. नामनिर्देशन अर्जात नमूद केलेल्या पक्षानुसार चिन्ह वाटप केले जाईल. त्यासह जे उमेदवार अपक्ष उभे होतील त्यांनाही स्वतंत्र चिन्ह दिले जाईल. २९ एप्रिल रोजी तीन वाजेपर्यंत निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल.

# विखेना मिळाले श्रद्धेय भगवान गडांचे आशीर्वाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**खरवंडी । प्रतिनिधी**

अहिल्यानगर (अहमदनगर) दक्षिण लोकसभेचे उमेदवार डॉ सुजय विखे पाटील यांनी जिल्हयातील श्रध्देय गडाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. येथे येऊन काम करण्यासाठी मोठी उर्जा मिळते. येथील प्रेरणा घेऊन समाजासाठी काम करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे त्यांनी सांगितले.

खा. सुजय विखे पाटील यांनी आपल्या मतदार संघात प्रचारात आघाडी घेतली असून गावोगावी त्यांच्या भेटी वाढल्या आहेत. गावोगावी लोकांना भेटून महायुती सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्फत केलेल्या लोककल्याणकारी कामांची माहिती लोकांना देत आहेत. देशात सुरू असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हमी, ही सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी आणि देशासाठी आवश्यक असून येणाऱ्या काळात देशाला जागतिक स्तरावर नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खंबीर नेतृत्व असून देश त्यांच्या हाती सुरक्षित असल्याने लोकांनी पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी महायुतीच्या उमेदवाराला मतदान करा असे आवाहन ते नागरिकांना करत आहेत. लोकसभा



निवडणुकीच्या प्रचारार्थ डॉ. सुजय विखे पाटील यांनी भगवान गड परिसरातील गावांना भेटी दिल्या यावेळी त्यांच्या सोबत आमदार मोनिका राजळे आणि इतर कार्यकर्ते होते. यावेळी डॉ. विखे यांनी भगवान बाबांच्या समाधीला अभिवादन करत महंत शास्त्री महाराज यांचे आशिर्वाद घेतले. तसेच गड परिसरातील ग्रामस्थांशी संवाद साधला. तर ग्रामस्थांनी देखील त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द यावेळी दिला. खरवंडी, दैत्य नांदूर, टाकळी,पाथर्डी तालुक्यातील अनेक गावातील ग्रामस्थांनी सुजय विखे पाटील यांचे वाजतगाजत भव्य स्वागत केले.यावेळी संवाद साधताना ते म्हणाले की प्रथा, परंपरे प्रमाणे मी गडावर आलो आहे, शास्त्री महाराजांनी मला आशीर्वाद दिला आहे, भगवानगडाच्या परिसराच्या विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून आम्ही नेहमीच कटीबद्ध राहू असा देखील विश्वास त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिला. तसेच भगवानगड हे महाराष्ट्रातील प्रमुख अध्यात्मिक केंद्र असून त्याचा पर्यटन क्षेत्र म्हणुन विकास करण्याचा मानस त्यांनी व्यक्त करत त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करणार असे त्यांनी सांगितले. तसेच संत ज्ञानेश्वरांच्या मंदिराचे काम पुर्ण केले जाईल. तसेच पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांच्या रोजगारासाठी पाऊले उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक आमदार मोनिकाताई राजळे यांनी सुद्धा मार्गदशन केले. मोनिकाताईंनी सांगितले की, मागील पाच वर्षात डॉ. सुजय विखे यांनी जिल्ह्याचे विविध प्रश्न प्रभावीपणे संसदेत मांडून जिल्ह्याला मोठ्या प्रमाणात निधी मिळऊन विविध विकास कामे केली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांना साथ मिळाल्याने येणाऱ्या काळात डॉ. विखे जिल्ह्याच्या विकास अधिक जलद गतीने करतील. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना त्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात आणल्या जातील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. मनसेचे नेते देविदास खेडकर यांनी सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांना मतदान करण्याचे आवाहन केले.यावेळी पाथर्डी शेवगावमतदारसंघातीलअनेक गावातील सरपंच,उपसरपंच, आजी-माजी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटींवर दिला भर;कार्यकर्त्यांच्या संवाद बैठका

# मला दिलेलं प्रत्येक मत जिल्हयाच्या विकासाला जाईल ही संधी वाया घालू नका-पंकजाताई मुंडेंनी घातली साद







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत विरोधकांकडे कोणताही अजेंडा नाही, त्यामुळेच ते जातीपातीचे राजकारण पुढे करत जनतेमध्ये बुद्धिभेद करण्याचे काम करत आहेत. भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन आपल्या विकासाचं व्हीजन मतदारांपर्यंत जाऊन सांगावं. तुमचं मला मिळालेलं प्रत्येक मत हे जिल्हयाच्या विकासाला जाणार आहे, त्यामुळे ही संधी वाया घालू नका. पुढील पाच वर्षे सेवा करण्यासाठी आशीर्वाद द्या असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.

पंकजाताई मुंडे यांनी आज मतदारसंघातील घाटनांदुर, पट्टीवडगांव, बर्दापूर, राडी सर्कलमधील गावांचा झंझावती दौरा करून मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेतल्या तसेच महायुतीच्या कार्यकर्त्यांशी देखील संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. घाटनांदुर, सायगाव, वाघाळा, हनुमंतवाडी, तळणी, हातोला, जवळगाव, पुस, तळेगाव येथे मतदारांशी गाठीभेटी घेत संवाद साधला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अच्युत गंगणे, राष्ट्रवादीचे गोविंद देशमुख,बन्सी अण्णा सिरसाट, घाटनांदुरचे सरपंच महेश गारठे, वैजनाथ आप्पा गारठे, शिवाजी सिरसाट, शाम आपेट, नेताजी देशमुख, गणेश कराड, गोपाळराव दरगड, दिलीप गिते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र टीम करावी. दोन्ही पक्षाच्या गट व गण प्रमुखांनी गणांचा दौरा करून मतदारांशी थेट भेटावं असं सांगत पंकजाताई मुंडे म्हणाल्या, मी मंत्री असताना मतदारसंघांत खूप निधी दिला, सत्ता गेल्यावर अडीच वर्षे मी दिलेलीच कामे सुरू होती. मतदारसंघातील सगळ्याशी माझे ऋणानुबंध आहेत. हक्काने तुम्ही मला सर्व सांगू शकता. सर्व स्थिती सकारात्मक आहे त्यामुळे अशी संधी परत येणार नाही. मला राजकारणाचा आणि प्रशासनाचा अनुभव असल्याने याचा उपयोग विकासासाठी करत राहील. मागील पाच वर्षांत पद नसतांना लोकांशी अटेचमेन्ट ठेवली. बरीच कामे केली. इथला रेल्वेचा थांबा पूर्ववत करून देऊ.काहीच अडचण येणार नाही. खासदार झाल्यास पंतप्रधान मोदींकडून मी हक्काने काम करून घेऊ शकते. याचा आपल्या जिल्हयाला फायदाच होईल.राजकारणात जाती-पातीचे खूप तण सध्या उगवले आहे ते तण काढून फेकून द्या. आलेली संधी वाया घालू नका. विरोधक बुद्धिभेद करतील, कारण त्यांचेकडे दुसरा अजेंडा नाही. मुस्लिम, मराठा समाज बांधवांना विकासाचे व्हिजन समजावून सांगा. तुम्ही संधी दिल्यास जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलून टाकील असा विश्वासही पंकजाताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला. आपल्याला मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करायचे आहे. हे विसरू नका त्यामुळे अधिकाधिक मताधिक्य मिळवण्यासाठी कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे. असे आवाहनही पंकजाताईंनी केले.मंत्री असताना मी कधी कुणाला त्रास दिला नाही.जातीवादाला थारा दिला नाही त्यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मला पुढची पाच वर्षे सेवा करण्याची संधी द्या.तुमचे मत वाया जाऊ देणार नाही जिल्ह्याचा विकास करून तुमच्या मताची परतफेड करेन असा विश्वास याप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.आजच्या दौऱ्यात पंकजाताई मुंडे यांनी सायगाव येथील दर्ग्यात चादर चढवून दर्शन घेतले. यावेळी तिथल्या धर्मगुरूंचे आशीर्वाद घेतले. तसेच उपस्थित मुस्लिम बांधवांशी संवाद साधला. घाटनांदुरकडे मार्गस्थ होत असताना तळणी, हनुमंतवाडी येथील ग्रामस्थांनी वाहनाचा ताफा थांबवून पंकजाताईंचे स्वागत केले.

दैनिक लोकनेता



# हिंगोली लोकसभा मतदार संघात ६३ टक्के मतदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा मतदार संघात शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत ६३.५४ टक्के मतदारांनी मतदान केले, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.



यामध्ये वसमत विधानसभा मतदार संघ ६२.५४, हदगाव ६५.५३, हिंगोली ५९.९२, कळमनुरी ६३.६०, किनवट ६५.८६ आणि उमरखेड विधानसभा मतदार संघात ६४.३७ टक्के मतदान झाले आहे.

ही निवडणूक पार पाडण्यासाठी निवडणूक निरीक्षक श्रीमती एम. एस. अर्चना, खर्च निरीक्षक श्री. अन्वर अली, श्री. कमलदीप सिंह, निवडणूक निरीक्षक (पोलीस) श्री. आर. जयंथी आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या निगराणीखाली ही प्रक्रिया पार पडली.

यामध्ये विधानसभानिहाय एकूण मतदार आणि झालेले मतदान याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.८२-उमरखेड विधानसभा मतदारसंघात १ लाख ९६ हजार ७२८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून त्यामध्ये १ लाख ५ हजार ९८४ पुरुष, ९० हजार ७४३ महिला तर एका तृतीयपंथी मतदारामध्ये समावेश आहे. ८३-किनवट विधानसभा मतदार संघात १ लाख ७७ हजार २५८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून त्यामध्ये ९३ हजार ६५५ पुरुष, ८३ हजार ६०१ महिला, तर २ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. ८४-हदगाव विधानसभा मतदार संघात १ लाख ९० हजार ३३८ मतदारांनी मतदान केले असून त्यामध्ये १ लाख २ हजार ९९७ पुरुष, ८७ हजार ३३८ महिला आणि ३ तृतीयपंथी मतदाराचा समावेश आहे.

तर हिंगोली जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदार संघामध्ये मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्यात सहभागी होत मतदानाचा हक्क बजावला आहे. त्याचा विधानसभा मतदार संघनिहाय तपशीलपुढीलप्रमाणे आहे. ९२-वसमत विधानसभा मतदार संघामध्ये १ लाख ९४ हजार ८९ मतदारांनी मतदान केले असून त्यामध्ये १ लाख ७ हजार ६९१ पुरुष, ८६ हजार ३९७ महिला तर एका तृतीयपंथी मतदाराने आपल्या मताचे दान उमेदवाराच्या पारड्यात टाकले. ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघात २ लाख २ हजार ८४५ मतदारांनी मतदान केले असून १ लाख ११ हजार १९६ पुरुष, ९१ हजार ६४८ महिला व एका तृतीयपंथीयाचा समावेश आहे. तर ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघातील मतदानाची टक्केवारी सर्वात कमी असून त्यामध्ये १ लाख ९३ हजार ७०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये १ लाख ६ हजार ७८१ पुरुष, ८६ हजार ९१८ महिला आणि एका तृतीयपंथीयाचा समावेश आहे.

हिंगोली लोकसभा मतदार संघातील एकूण मतदारांची संख्या १८ लाख १७ हजार ७३४ मतदारांपैकी ११ लाख ५४ हजार ९५५ मतदारांनी या निवडणुकीत मतदान केले आहे. त्यामध्ये ६ लाख २८ हजार ३०२ पुरुष, ५ लाख २६ हजार ६४४ महिला आणि ९ तृतीयपंथी मतदारांने मतदानाचा हक्क बजावला आहे. मतदानाची एकूण टक्केवारी पाहता ८३-किनवट विधानसभा मतदार संघ (६५.८६ टक्के) अव्वलस्थानी राहिला असून हिंगोली विधानसभा मतदार संघातील मतदान (५९.९२ टक्के) सर्वात कमी राहिले आहे. हिंगोली लोकसभा मतदार संघात २५ तृतीयपंथी मतदारांपैकी ९ जणांनी या राष्ट्रीय कर्तव्यात आपला सहभाग नोंदवला.

किनवट विधानसभा मतदारसंघाच्या सहायक जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी श्रीमती कावली मेघना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, सहायक निवडणूक अधिकारी उमाकांत पारधी, श्रीमती क्रांती डोंबे, डॉ. सचिन खल्लाळ, डॉ. सखाराम मुळे, अविनाश कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी दिलीप कच्छवे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) गणेश महाडीक, समाधान घुटूकडे यांच्यासह सर्व पथक प्रमुखांनी प्रयत्न केले.

निवडणुकीचा दुसरा टप्पा

देशात दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रासह आसाम, बिहार, छत्तीसगड, जम्मू आणि काश्मीर, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, मणिपूर, राजस्थान, त्रिपुरा, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडली. राज्यात विदर्भातील यवतमाळ-वाशीम, अकोला, अमरावती, बुलडाणा, वर्धा या पाच आणि मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि परभणी लोकसभा मतदारसंघाचा समावेश होता.

# पत्रकार संतोष भुतेकर यांना धमकी देणाऱ्या विरुद्ध पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**अंबड (वृत्तसंस्था)**

जालन्यातील पत्रकार आणि दै. जगाचा जगमित्रचे संपादक संतोष भुतेकर यांना फोनवरुन धमक्या आणि शिविगाळ करणाऱ्या भाजपा उमेदवार रावसाहेब दानवे यांचे तथाकथित कार्यकर्ते शिवाजी गायकवाड यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्यासह संतोष भुतेकर यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी अंबडच्या पत्रकारांच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या संपुर्ण देशात लोकसभेच्या निवडणुका आणि प्रचाराची रणधुमाळी जोरात आहे. जालन्यातील दै. जगाचा जगमित्र हे एक नियमित आणि प्रभावी वृत्तपत्र म्हणून जालना जिल्ह्यासह मराठवाडा परिसरात परिचित आहे. पत्रकार कधीही एखांद्या ठराविक पक्ष संघटनेशी बांधीलकी किंवा विरोध म्हणून पत्रकारीता करत नाहीत.

दै. जगाचा जगमित्र आणि त्या वृत्तपत्राचे संपादक संतोष भुतेकर हे त्यांच्या वृत्तपत्रातून निवडणूक काळात विविध पक्ष संघटनांच्या बातम्या सातत्याने आग्रही भूमिकेतून प्रसिध्द करत आहेत. तथापि त्यांनी त्यांच्या वृत्तपत्रातून प्रसिध्द केलेल्या भाजप उमेदवारांच्या संदर्भातील बातम्या वाचून संपादकांना थेट फोनवर धमकावणे, त्यांच्या माता-पित्यांचा शिवराळ भाषेत उल्लेख करणे, घरात घुसून मारण्याच्या तयारीने वाट्टेल ते वक्तव्य करणे. या सर्व गोष्टी अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहे.

या प्रकरणी किरकोळ स्वरूपाचा अदखलपात्र गुन्हा दाखल करून पत्रकारांवर एकप्रकारे अन्याय केला आहे. तसेच पोलीस आणि प्रशासनाकडूनही नेमकी कारवाई अपेक्षीत आहे. यास्तव आपण या गंभीर प्रकरणात लक्ष घालून संबंधीत आरोपीविरूध्द पत्रकार संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करून श्री भुतेकर यांना पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

यावेळ संतोष जिगे पाटील, शिवाजी मस्के, गिताराम मते , अशोक गाढे, सिध्देश्वर उबाळे, अनिल भालेकर , शेख फारुक, सोहेल चाऊस, जहिर शेख, संजय उपाध्ये, सय्यद नाजिम, रफिक शेख, गोंविद खरात, भरत टकले, श्रीधर कापसे, बाबासाहेब खरात, सगीर बिल्डर, सुरेश खरात आदींसह व्हाईस ऑफ मिडिया व मराठी पत्रकार संघ, पत्रकार संरक्षण समिती अंबड यांची उपस्थिती होती.

# महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विजयासाठी आ.आजबे काका यांनी लोणी गट पिंजून काढला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार मा पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.बाळासाहेब आजबे काका यांनी लोणी जिल्हा परिषद गटातील गाव भेट दौरा केला.यामध्ये खुंटेफळ वाटेफळ.लोणी,पिंपळा, सोलापूरवाडी, खुंटेफळ, पुंडी , पिंपळगाव दाणी, सराटे वडगाव, टाकळी ,रुई, फत्तेवडगाव व नांदा या गावांमध्ये जाऊन कॉर्नर बैठका व मतदारांच्या भेटी घेतल्या.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे,भाऊसाहेब लटपटे,जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील थोरवे सरपंच अशोक पोकळे, राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष भाऊसाहेब घुले, हरिभाऊ दहातोंडे, सुभाष वाळके ,अर्जुन काकडे,यावेळी जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब लटपटे ,धैर्यशील थोरवे काकासाहेब शिंदे,नगरसेवक नाजीम शेख अशोक पोकळे सुभाष वाळके , चंद्रगुप्त खलाशे, उद्धवशेठ मोडवे ,महादेव अमृते, बाबा कोहक, गणेश सासवडे, राजू वाघमोडे, अनिल गाडे, संतोष गुंड, आजिनाथ बेल्हेकर, भगवान रक्ताटे, सुभाष भोसले, एकनाथ वाळके, अक्षय सावरे, बाबासाहेब सावरे, भिकाजी वाळके, रामकिसन वाळके चांद भाई सय्यद, नितीन मिसाळ, विजय गायकवाड, जनार्दन भोर, बलभीम काळोखे,अशोक कुताळ, मारुती मुळे, कुंडलिक शेंडगे, सतीश अरुण, राजेंद्र शिंदे, विनोद शिंदे, राहुल अरुण, रामभाऊ सायबर, अशोक भिटे, रावतात्या भस्मे, ज्ञानदेव मिसाळ, बबन अनपट, शिवाजी मुकींनंद, भीमराव बोडके, सरपंच बबनराव ननवरे, कोंडीराम झांबरे, शिवदास ननवरे, बाबुराव सुंबरे, गोवर्धन संबरे, आप्पा महाराज सुंबरे श्रीरंग बापू तरटे शेख नवी गोरख शिंदे गोरख मिसाळ दादा राऊत शामराव फसले भिवाजी सासरे रामकिसन वाळके अर्जुन काकडे शिवाजी थोरवे बबन थोरवे महादेव थोरवे सुदाम खांदवे संजय थोरवे राजू खांदवे राजू मोरे श्रीधर भालेराव भास्कर थोरवे काशिनाथ थोरवे संजय काकडे संदीप जगदाळे नानाभाऊ वाडेकर दिलीप थोरवे विलास काकडे कृष्णा गलांडे पांडुरंग भालेराव दत्तू भालेराव हिंमत काकडे कांतीलाल थोरवे नवाजी काकडे ऋषिकेश काकडे बळीराम वाडेकर ज्ञानेश्वर भालेराव तुळशीराम थोरवे यांच्यासह खुंटेफळ वाटेफळ, लोणी,पिंपळा, सोलापूरवाडी, कुंटेफळ ,पुंडी, पिंपळगाव दाणी, मेहेकरी, सराटेवडगाव, रुई,नांदा व फत्तेवडगाव इत्यादी गावातील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते ,मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोली लोकसभेसाठी बाबुराव कदम कोहळीकर यांना रामदास पाटील सुमठाणकर यांचा होणार चांगला फायदा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली लोकसभेसाठी दुसऱ्या टप्प्यातली निवडणूक दि २६ एप्रिल रोजी झाली असून यातच हिंगोली लोकसभेसाठी महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोळेकर यांना रामदास पाटील सुमठाणकर यांचा चांगलाच फायदा झाल्याचं पाहायला मिळालं आहे रामदास पाटील सुंमठाणकर हे भाजप कडून लोकसभेसाठी तयारी करत होते पण मात्र हिंगोली लोकसभेची जागा ही शिवसेना (शिंदे गटाला) मिळाल्याने रामदास पाटील सुंमठणकर यांना माघार घ्यावी लागली त्यानंतर रामदास पाटील सुमठाणकर यांनी कसून प्रचार व मित्रमंडळींना भेटी गाठी दिल्याने बाबुराव कदम कोहळीकर यांना रामदास पाटील सुंमठाणकर यांचा चांगलाच फायदा होताना दिसून आले आहे, तर महायुतीचाच हिंगोली लोकसभेवर झेंडा फडकणार असे देखील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्याकडून बोलले जात आहे, तरी दिनांक ४ मे रोजी हिंगोली लोकसभेचा निकाल लागणार असून सर्वांचं लक्ष या निकालाकडे लागणार आहे,



# हिंगोली लोकसभा मतदार संघात अंदाजे ६२.६७ टक्के मतदान

## निवडणूक विभागाची १०२६ मतदान केंद्रांवर वेबकास्टींगद्वारे करडी नजर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा मतदार संघात ३३ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, आज मतदारसंघात २००८ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. १८ व्या लोकसभा निवडणुकीत आज अंदाजे ६२.६७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

हिंगोली लोकसभा मतदार संघातील वसमत विधानसभा मतदार संघ ६०, हदगाव ६६, हिंगोली ६०, कळमनुरी ६३, किनवट ६५ आणि उमरखेड विधानसभा मतदार संघात अंदाजे ६२ टक्के मतदान झाले आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघात एकूण १८ लाख ७७ हजार ७३४ मतदार असून, त्यामध्ये ९ लाख ४६ हजार ६७४ पुरुष तर ८ लाख ७१ हजार ३५ महिला मतदार आहेत. त्याशिवाय इतर २५ मतदारांचा यात समावेश आहे.

निवडणूक निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाची प्रक्रिया पूर्ण

निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना, निवडणूक खर्च निरीक्षक अन्वर अली, कमलदीप सिंह, निवडणूक निरीक्षक (पोलीस) श्रीमती आर. जयंथी यांनी हिंगोली लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया शांततेत, निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी परीश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पाडली, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

जिल्हा प्रशासनाची वॉर रुममधून वेब कास्टींगद्वारे करडी नजर

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर हे दिवसभर निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी १०२६ मतदान केंद्रांवर वेबकास्टींगद्वारे करडी नजर ठेवून होते. संपूर्ण लोकसभा मतदार संघातील मतदान प्रक्रिया सुरळीत राहण्यासाठी त्यांनी सतत मार्गदर्शन केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) गणेश महाडीक, उपजिल्हाधिकारी समाधान घुटूकडे यांच्यासह सर्व पथक प्रमुख जिल्हा नियोजन समिती सभागृहातील वॉर रुममध्ये उपस्थित होते. तत्पूर्वी निवडणूक खर्च निरीक्षक अन्वर अली यांनीही वॉर रूमला भेट देऊन निवडणूक प्रक्रियेची माहिती घेतली.

मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी निवडणूक आयोग आणि जिल्हा निवडणूक विभागातर्फे प्रयत्न करण्यात आले. त्याचाच भाग म्हणून हिंगोली लोकसभा मतदार संघात महिला कर्मचारीद्वारे संचालित मतदान केंद्र-७, दिव्यांग कर्मचारी संचलित ६ व युवा मतदान केंद्र-६ असे एकूण १९ आदर्श मतदान केंद्र तयार करण्यात आले होते, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्री.पापळकर यांनी दिली आहे.

या सर्व मतदान केंद्रावर उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे सावलीसाठी शामियाना, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रॅम्पची सुविधा, व्हील चेअर, दिव्यांग व्यक्तींसाठी पूरक सेवा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तसेच दिव्यांग मतदारांना ने-आण करण्यासाठी सक्षम पवर नावनोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

मतदार संघात आज सकाळपासूनच शहरी व ग्रामीण मतदारांनी मोठ्या उत्साहाने लोकशाहीच्या या उत्सवात भाग घेतल्याचे जागोजागी दिसून येत होते. मतदान प्रक्रिया (मॉक पोल) सुरू असतानाच ३९ मतदान यंत्रात बिघाड झाल्याचे लक्षात येताच जिल्हा निवडणूक यंत्रणेकडून तातडीने मतदान यंत्र बदलवून मतदान प्रक्रिया सुरळीत करण्यात आली.

जिल्हा प्रशासनाकडून मतदारांना प्रोत्साहन

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विक्रमी संख्येने मतदारांना आवाहन केले होते. त्यासाठी स्वीपच्या माध्यमातून रॅली, पथनाट्य, आई-बाबांना पत्र, लोकशाहीचं लग्न असे विविध उपक्रम राबवून व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात आली. जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदान प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904